(सकाळ)

जा.क्र.३३७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १९/०५/२०१७

**१) समोरील दाराचा ताला कोंडयासह तोडुन आलमारीतील सोन्याचांदीचे दागीने व नगदी चिल्लर पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०५/२०१७ चे १२.०० वा.ते दि. १८/०५/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीने आपले घराला ताला लावुन लग्न कार्याकरिता गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा ताला कोंडयासह तोडुन आत प्रवेश करून घरातील आलमारीतील ठेवलेला १ सोन्याचा नेकलेस १२.४५ ग्रॅम, २ सोन्याच्या अंगठया प्रत्येकी ५ ग्रॅम, सोन्याची लहान अंगठी १ ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र २ तोडे, सोन्याची काळीपोत लॉकेटसह २.४ ग्रॅम, सोन्याचे २ खडे १८० मिली ग्रॅम, चांदीची चैन, चांदीचा करदोडा, चांदीचा आकडा व नगदी चिल्लर १००/रू. असा एकुण ६५,१३८ /रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी अरविंद व्यंकटराव वलथरे वय ४६ वर्ष रा. गोबरवाही यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. गोबरवाही येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि झोटींग पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**२) महिलेच्या गळयातील गाठीमधील पिवळया धातुचे मनी व डोर जबरीने हिसकावुन चोरून व ब्लेड मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १८/०५/२०१७ चे १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शांताबाई बेवा देवराम शिंदे वय ७० वर्ष रा. सितेपार ही नरेंद्र गुलाबराव ढोके रा. तुमसर यांचे शेतावर काम करित असतांना यातील अनोळखी आरोपी याने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादी जवळ जावुन उभा राहुन पाणी दे असे बोलल्याने तेव्हा फिर्यादीने म्हटले की विहीरीवर जा स्वत: काढुन घे असे बोलल्यावरून फिर्यादीचे गळयातील गाठी मधील १२ मनी व दोन डोर पिवळया धातुचे किंमती २०००/रू. चा माल जबरीने हिसकावुन चोरून नेल्याने व तिच्या हातावर ब्लेड मारून जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोस्टे. सिहोरा येथे कलम ३९४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डोंगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) संगनमत करून क्षुल्लक कारणावरून लोखंडी रॉडने कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १७/०५/२०१७ ते २२.३० वा. दरम्यान यातील जखमी फिर्यादीने आपले कापड दुकानातील आरोपी क्र. १ यास कामावरून काढले असता फिर्यादी हा आपले दुकान बंद करून लहान भावाचे मुलीसोबत मोटार सायकलने घरी जात असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करून मोटार सायकलने तीन सिट येवुन फिर्यादीचे मोटार सायकल जवळ थाबुंन फिर्यादीला लोखंडी रॉडने कपाळावर मारून जखमी केल्याने फिर्यादी चंद्रप्रकाश खेमचंद भोजवानी रा. सिंधी कॉलोनी गुरूनानक वार्ड भंडारा यांचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे. भंडारा येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) शेतातील धुऱ्याजवळ कुक्सामध्ये विषारी पदार्थ ठेंवल्याने व चरणाऱ्या शेळयांनी ते खावुन मरण पावल्याने व नुकसान झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०५/२०१७ ते १२.०० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने भोजराम वरकडे यांचे शेतातील धुऱ्याजवळ कुक्सामध्ये विषारी पदार्थ ठेवल्याने चरणाऱ्या शेळयांनी ते खाल्याने फिर्यादीच्या ३ शेळया व ईतर लोकांच्या ३ शेळया अशा एकुण ०६ शेळया मरण पावल्याने एकुन ३०,०००/रू. चे नुकसान केल्याने फिर्यादी संपत सुकाजी फुलबांधे वय ५५ वर्ष रा. दिघोरी/आंमगाव यांचे तोंडी रिपोर्ट व ओ.पी. धारगाव आकरन्स क्र. ११/१७ दि. १८/०५/२०१७ अन्वये पो.स्टे. कारधा येथे कलम ४२९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**५) अल्पवीन मुलीस फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोदं . :–**

दिनांक १७/०५/२०१७ चे १३.३० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष ही सालई बु. येथे असतांनी यातील आरोपी पाहुणा म्हणुन आल्याने त्याने फिर्यादीचे अल्पवीन मुलीस फुस लावुन पळवुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. साकोली येथे कलम ३६३ भांदवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) अति दारू सेवन केल्याने औषधोपचारा दरम्यान ईसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०५/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील मृतक देवचंद भिमराव राऊत वय ३२ वर्ष, रा. बोरी याने दारू अति सेवन केल्याने त्यास औषधोपचार करिता सा.रू. भंडारा येथे भर्ती केले असता उपचारा दरम्यान दि. १७/०५/२०१७ चे १६.०० वा. मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरून पो.स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/२०१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. तांडेकर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ.. गौर पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**७) दारूचे नशेत किटकनाशक प्राशन केल्याने युवकाचा मृत्यु . :–**

दिनांक १७/०५/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी चा मृतक मुलगा संदिप हरीभाऊ बनकर वय २२ वर्ष, रा. विहीरगाव याने दारूचे नशेत आपले राहते घरी कोणते तरी किटकनाशक औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचार करिता उपजिल्हा रूग्णालय साकोली येथे नेले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने डॉक्टरी मेमो व फिर्यादी हरीभाऊ विश्वनाथ बनकर वय ५२ वर्ष रा. विहीरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**८) अवैध जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. कारधा येथे अवैध जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन किंमती ३१३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०६ तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.